**Bachelor of Commerce (B.Com.) Semester—IV Examination**
**MARATHI**
**Paper—6**
**(Other Compulsory Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना :— सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **चारशे** शब्दांत निबंध लिहा :—
   (i) साहित्य आणि संस्कृती
   (ii) माझा आवडता लेखक
   (iii) साहित्यातील सामाजिक जाणीव
   (iv) ज्ञानभाषा मराठी. 16

2. 'इंद्रायणीच्या वाळवंटात' पाठातून संत तुकारामांच्या महाजतेजी प्रचिती लेखकाने कशी घडविली आहे.

**किंवा**

विज्ञानयुगात भारताने केलेल्या वाटचालीचा आढावा जयंत नारळीकरांनी कसा घेतला आहे ? 16

3. विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या कोणकोणत्या श्रेष्ठ गुणांचे वर्णन कवी केशवसुतांजी केले आहे ?

**किंवा**

'आता आम्ही' या कवितेचे रसग्रहण करा. 16

4. खालीलपैकी कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे लिहा :—

**गट—अ**

(क) ना.सी. फडके यांनी खऱ्या मित्राचे वर्णन कसे केले आहे ?
(ख) रामा मैलकुलीचे व्यक्तिचित्र रेखाटा.
(ग) 'कोल्हाटीण' या भारूडातून एकनाथांनी आदिशक्तीचे वर्णन कोणत्या शब्दांत केले आहे ?
(घ) 'खेडी उद्‌ध्वस्त होत आहेत' असे कवी कोणत्या संदर्भात म्हणतात ?

**किंवा**

**गट—ब**

(च) 'विदुराच्या जीवनाचे खरे सार माणूस आहे' असे दुर्गा भागवत का म्हणतात ?
(छ) यानंतर बंदुकीने शिकार करायची नाही असा निर्णय मारूती चितमपल्ली का घेतात ?
(ज) 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' असे कवी यशवंत का उद्‌गाश्तात ?
(झ) जागतिकीकरण आणि चंगळवादाचे वर्णन कवी वसंत आबाजी डहाके यांनी कसे केले आहे ? 16

5. खालील **सर्व** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :—
   (प) मित्राचे जीवनातील महत्व सांगा.
   (फ) मोहरूपी सर्पाचे विष केवळ सद्‌गुरुरूपी गारुडीच उतरवू शकतो असे संत एकनाथं का म्हणतात ?
   (ब) स्मरणिकेच्या संपादन कार्याचे स्वरूप स्पष्ट करा.
   (भ) खालीलपैकी कोणत्याही **चार** वाक्यप्रचारांचा अर्थ लिहा :
      (i) नाक खुपसणे
      (ii) तोंडचे पाणी पळणे
      (iii) पाठीत खंजीर खुपसणे
      (iv) अस्मान ठेंगणे होणे
      (v) जमीनदोस्त करणे
      (vi) लक्ष्मणरेषा ओलांडणे. 16